**नवी मुंबई महानगरपालिका**
**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 19 जानेवारी 2018 रोजी भरलेल्या माहे ऑगस्ट 2017 महिन्याच्या सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 02 दिनांक 18 ऑगस्ट 2017.** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी**

**माहे 18 ऑगस्ट 2017 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. रविंद्र. उध्दव इथापे, यांजकडून :-** नवी मुंबईमध्ये ऊन, वारा, आणि, पावसापासून इमारतीचे संरक्षण व्हावे यासाठी शहरातील अनेक सोसायटयांनी इमारतीच्या छतावर गरजेपोटी पावसाळी शेड बांधलेले आहेत. त्यांना महापालिकेने नोटीस बजावलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सिडकोने आणि खाजगी विकासकाने बांधलेल्या निकृष्ट दर्जाच्या इमारती असल्याने त्या मोडकळीस आलेल्या असून पावसाळयामध्ये त्यांचे छत गळते, त्यामुळे बहुतेक सोसायटयांनी पावसाळी पत्र्याचे शेड बांधलेले आहे त्यांना महापालिकेने नोटीस देऊन ते हटविण्यास सांगितले आहे. विकास नियंत्रण नियमावलीत ते बेकायदा ठरतात. परंतु त्याचा व्यवसायिक वापर कोणीही करत नाही. त्यामुळे ती नियमित करावीत व तसा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव संमत करणे. | 34<br>ऑगस्ट | 77<br>19/01/2018 | मंजूर |
| 2. | **श्री. रविंद्र. उध्दव इथापे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 100 भिमाशंकर सोसायटीच्या पाठीमागील बाजुस उरणफाटा ते पुनीत पार्कच्यामध्ये असलेल्या हायटेन्शनखाली असलेल्या मोकळया जागेचे सपाटीकरण करुन हिरवळ लावून सुशोभिकरण करणे. | 35<br>ऑगस्ट | 78<br>19/01/2018 | मंजूर |
| 3. | **श्री. रविंद्र. उध्दव इथापे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 100 भिमाशंकर सोसायटीच्या बाजूला उरणफाटा ते रायन इंटरनॅशनल स्कूल मधील हायटेन्शनखाली असलेल्या मोकळया जागेचे सपाटीकरण करुन हिरवळ लावून सुशोभिकरण करणे. | 36<br>ऑगस्ट | 79<br>19/01/2018 | मंजूर |
| 4. | **श्री. लिलाधर गणपत नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 50 बोनकोडे मधील सावरीया डेअरी ते उदयान क्र. 9 सी. पर्यंतच्या रस्त्यावर वाहनांची मोठया प्रमाणात ये-जा वाढल्याने रस्त्यावर वारंवार खडडे पडत असतात, त्यामुळे ट्रॅफिक ची समस्या निर्माण होत असते, तरी सदर रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | 40<br>ऑगस्ट | 80<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागात मागील दोन वर्षात सुचविलेल्या विकास कामांचा आढावा घेण्यात यावा व सदर कामे ठरावात मंजूर झाल्याप्रमाणे लवकरात लवकर कामे प्रस्तावित करणे. | 41<br>ऑगस्ट | 81<br>19/01/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महापालिकांच्या सर्व शाळामधील बंद केलेले संगणक शिक्षण त्वरीत चालु करुन विदयार्थ्यांचे संगणकिय ज्ञान वाढविण्यासाठी भरीव खर्चाची नव्याने तरतुद करणे. | 42<br>ऑगस्ट | 82<br>19/01/2018 | मंजूर |
| 7. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>ज्या प्रभागात महानगरपालिकेच्या शाळा आहेत मात्र दहावी पर्यंत शिक्षणाची सोय करण्यात यावी त्यासाठी नव्यने लागणा-या वर्गांचे बांधकाम प्रस्तावित करणे. | 43<br>ऑगस्ट | 83<br>19/01/2018 | मंजूर |
| 8. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 28 अंतर्गत शंकरबुवा वाडीतील जुनी गटारे तोडून नव्याने हेवी डयुटी गटार बांधणे. | 44<br>ऑगस्ट | 84<br>19/01/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 28 अंतर्गत घणसोली गावात जाण्याच्या रस्त्यावर शंकरबुवा चौकाशेजारी स्पीड ब्रेकर लावणे. | 45<br>ऑगस्ट | 85<br>19/01/2018 | मंजूर |
| 10 | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 28 अंतर्गत दत्तनगर येथे अंगणवाडी बांधणे. | 46<br>ऑगस्ट | 86<br>19/01/2018 | मंजूर |
| 11 | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मधील घणसोली सेक्टर 21 येथे “माताबाल रूग्णालय” बांधण्यात यावे. नवी मुंबई महानगरपालिकेचे माताबाल रूग्णालय, नेरूळ, तुर्भे, कोपरखैरणे, ऐरोली येथे कार्यरत आहेत. घणसोली नोडमध्ये “माताबाल रूग्णालय” नाही. घणसोली नोड यात प्रामुख्याने घणसोली गांव, तळवली गाव, गोठवली गाव, राबाडा गाव, तसेच कातकरी पाडा, नौसिल नाका हे भाग येत आहेत. घणसोली सिडको वसाहतीत विकसित होणाऱ्या या नोड मध्ये नागरिकरण मोठ्या प्रमाणात होणार आहे. व म्हणून या ठिकाणी माताबाल रूग्णालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे. तरी घणसोली नोड करीता प्रभाग क्र. 29 घणसोली 2 मधील सेक्टर 21 येथे “माताबाल रूग्णालय” बांधणे. | 47<br>ऑगस्ट | 87<br>19/01/2018 | मंजूर |
| 12 | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागात म्हात्रे आळी, टेटर आळी, बौध्दवाडी, बाळारामवाडी, महादेववाडी, जयश्रीनगर, तीनबावडी ही नगरे येत आहेत. या ठिकाणी गटर योजना राबवावी. घणसोली गावातील सांडपाण्याची व पावसाळी पाण्याची ही गटारे ग्रामपंचायत असताना बांधली आहेत. आता या सर्व भागात इमारती झाल्या आहेत. ही गटारे तुटली आहेत व अपूरी पडत आहेत. लहान आकाराची गटारे असल्यामुळे सांडपाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही व पावसाळ्यात ह्या गटारांचा काही उपयोग होत नाही. त्यामुळे काही घरांत पाणी जात आहे व आरोग्याची समस्या निर्माण होत आहे. तरी ही गटारे मोठ्या आकाराची बांधण्यात येण्यासाठी गटार योजना राबविण्यात यावी. अंदाजपत्रक 2017 ते 2018 यात यासाठी तरतूद केली आहे | 48<br>ऑगस्ट | 88<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, , यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 58, वाशी सेक्टर 14 ते सतरा प्लाझा मॉल वाशी कोपरखैरणे पामबीच रस्त्यावर स्कायवॉक बांधणे. | 53<br>ऑगस्ट | 89<br>19/01/2018 | मंजूर |
| 14 | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, , यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 58, महात्मा गांधी कॉम्पलेक्स सेक्टर 14 येथील महापालिकेचा बंद करण्यात आलेल्या जागेवर विरंगुळा केंद्र तसेच तरूणांसाठी व्यायाम शाळा बांधणे. | 54<br>ऑगस्ट | 90<br>19/01/2018 | मंजूर |
| 15 | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, , यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 58, प्रभागातील सर्व पदपथ सिडकोनिर्मित आहेत. त्यांचे स्लॅब नियमित पडत असतात. तरी सर्व स्लॅब् नवीन करून ठिकठिकाणी हेवीड्युटी स्लॅब टाकावेत. तसेच सर्व पदपथ नवीन सुशोभित करणे. | 55<br>ऑगस्ट | 91<br>19/01/2018 | मंजूर |
| 16 | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>मागासवर्गीय घटका अंतर्गत, अल्पसंख्याक घटकातील इ.1ली ते 10वी, तसेच 10 वी ते महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीना शैक्षणिक शुल्कासाठी (फि) अर्थसहाय देणे. | 62<br>ऑगस्ट | 92<br>19/01/2018 | मंजूर |
| 17 | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55, खैरणेगांव येथील पादचारी पुलाची सुधारणा करणे. | 63<br>ऑगस्ट | 93<br>19/01/2018 | मंजूर |
| 18 | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 येथील नागरिकांसाठी वाचनालयची व्यवस्था करणे. | 64<br>ऑगस्ट | 94<br>19/01/2018 | मंजूर |
| 19 | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 26, महापे मधील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 41 अडवली भुतावली, या शाळेच्या खिडक्यांचे ग्रील गंजलेल्या अवस्थेत असुन ते सैल झाल्याने खिडकीच्या काचा खाली पडतात. ही खुप गंभीर बाब असुन येथील विदयार्थ्यासाठी धोका निर्माण झाला आहे. तसचे शाळेची रंगरंगोटी व दुरुस्ती न झाल्याने शाळेची दुरावस्था झाली आहे. तरी लवकरात लवकर शाळेची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. | 65<br>ऑगस्ट | 95<br>19/01/2018 | मंजूर |
| 20 | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावली गांवातील जुने मोबाईल टॉयलेट आठ वर्षापुर्वी लावण्यात आले आहे. सदर शौचालयाची पुर्णपणे दुरावस्था झाली असून या परिसरातील नागरीकांची गैरसोय झाली आहे. तरी मोबाईल टॉयलेट येथुन हलविण्यात यावे व नवीन पक्के शौचालय बनविणे. | 66<br>ऑगस्ट | 96<br>19/01/2018 | मंजूर |
| 21 | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, सेक्टर 24 येथील बामण झोटिंग मैदानाचे सुशोभिकरण करणे. | 67<br>ऑगस्ट | 97<br>19/01/2018 | मंजूर |
| 22 | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, मधील सेक्टर 18 येथे कै.शहिद तुकाराम ओंबळे इमारत आहे. सदर इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असुन, ती केव्हाही पडण्याची शक्यता आहे. तरी त्या ठिकाणी बहुउददेशिय इमारत बांधणे. | 68<br>ऑगस्ट | 98<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, मधील सेक्टर 18 मधील अनिरुध्द बापु मैदानात व्यासपीठ उभारणे व तेथे दोन छोटया खोल्या बांधणे जेणे करुन तेथे सांस्कृतिक कार्यक्रम करता येतील (माननीय खासदार श्री. राजनजी विचारे साहेबांनी या कामासाठी त्याच्या खासदार निधीतुन रु.20,0000/- (अक्षरी वीस लाख मात्र) देवु केले आहेत याची कृपया नोंद घ्यावी ) | 69<br>ऑगस्ट | 99<br>19/01/2018 | मंजूर |
| 24 | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>वाशीमध्ये ट्रक टर्मिनल असुन त्याठिकाणी बहुमजली मल्टीलेव्हल व्हॅलेट पार्किंगची सोय करण्यात यावी, तसेच सेक्टर-9 व सेक्टर-17 मध्ये नो पार्किंग झोन जाहिर करणे. | 70<br>ऑगस्ट | 100<br>19/01/2018 | मंजूर |
| 25 | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>महानगरपालिकेच्या ई.टी.सी. विभागात प्रि मॅरेटीअल (Pre-Marital) व पोस्ट मॅरेटीअल (Post-Marital) कौन्सिल चालू करणे. | 71<br>ऑगस्ट | 101<br>19/01/2018 | मंजूर |
| 26 | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकातील जे मुले-मुली प्रि मॅरेटीअल (Pre-Marital) कौन्सिलींग करून घेतील त्यांनाच महानगरपालिकेने मॅरेज सर्टिफिकेट देणे. | 72<br>ऑगस्ट | 102<br>19/01/2018 | मंजूर |
| 28 | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहुगांव सेक्टर 11 वाशी येथील जुहुगांव तलावाजवळील फुटपाथची दुरावस्था झालेली आहे. तसेच तलावाजवळ अंधार असतो. तरी सदर ठिकाणच्या फुटपाथची दुरुस्ती गणेश उत्सवा अगोदर करण्यात यावी व सदर ठिकाणी विदयुत खांब (हायमास्ट) बसविणे. | 74<br>ऑगस्ट | 103<br>19/01/2018 | मंजूर |
| 29 | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, सेक्टर 11 वाशी येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै. राधा सुदाम भोईर निवास बिल्डिंग येथील कमी व्यासाच्या मलनिस्सा:रण वाहिनी बदलुन तेथे मोठया व्यासाच्या मलनिस्सा:रण वाहिनी टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरब्लॉक बसविणे. | 75<br>ऑगस्ट | 104<br>19/01/2018 | मंजूर |
| 30 | **श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>मोरबे धरणातुन आलेल्या पामबीच मार्गावरील जलवाहिनी मधुन सानपाडा सेक्टर-01 पामबीच रेल्वे कारशेड लाईन पर्यंत 600 मीमी ची जल वाहीनी टाकण्यात आली आहे. व सानपाडा सेक्टर -04 येथील जलकुंभा पासुन सेक्टर 08 रेल्वे कारशेड लाईन पर्यंत 250 मी.मी. जलवाहिनी टाकुन झाली आहे. पामबीच से. - 01 येथील 600 मीमी जलवाहिनीतुन रेल्वेच्या लाईन खालून सेक्टर 08 पर्यंत आलेल्या 250 मीमी ही जल वाहीनी जोडण्यात आली तर सानपाडा विभागातील 04 प्रभागातील पाण्याची समस्या कायमस्वरूपी संपेल. सदर जलवाहिनी जोडणे. | 76<br>ऑगस्ट | 105<br>19/01/2018 | मंजूर |
| 31 | **श्रीम. रूपाली किमस्त भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16A येथील शाळा क्रमांक 8 व 9 मधील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे. | 79<br>ऑगस्ट | 106<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 32 | **श्रीम. रूपाली किमस्त भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16 येथील छत्रपती संभाजी राजे उद्यानात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे. | 80<br>ऑगस्ट | 107<br>19/01/2018 | मंजूर |
| 33 | **श्रीम. रूपाली किमस्त भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16A, 16 व 18 येथील नादुरूस्त गटारांची पुर्नबांधणी करणे. | 81<br>ऑगस्ट | 108<br>19/01/2018 | मंजूर |
| 34 | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>अर्थसंकल्पात तरतूद केल्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराज उदयानात महाराजांच्या नुसता पुतळा न उभारता त्यांच्या जीवनावर आधारित वास्तू उभारणे. | 85<br>ऑगस्ट | 109<br>19/01/2018 | मंजूर |
| 35 | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या परंतु अविकसित स्थितीत असलेल्या सार्वजनिक सेवासुविधासाठींचे आरक्षित भूखंड, भूभाग हे सामाजिक संस्थांना विविध कार्यक्रमासाठी तात्पुरत्या कालावधीसाठी नाममात्र शुल्क आकारणी करून देण्याची तरतदू करणे. | 86<br>ऑगस्ट | 110<br>19/01/2018 | मंजूर |
| 36 | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>भूखंड क्र. 148 आणि 149 से.16अे नेरूळ नवी मुंबई वरील आरक्षण व उद्यान प्रयोजन रद्द करून सदर परिसरात उद्यानाचे प्रयोजनासाठी भू.क्र. 150 व 151 से.16अे, नेरूळ नवी मुंबई राखीव करून तजवीज करणे. | 89<br>ऑगस्ट | 111<br>19/01/2018 | मंजूर |
| 37 | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>नेरूळ, पामबीच (झामा स्विट मार्ट जवळील) सिग्नल येथे भूमीपुत्र कोळी बांधवांना मच्छीमारीकरीता पलीकडे जेट्टीवर जाणेकरीता अंडरपास बांधणे. | 90<br>ऑगस्ट | 112<br>19/01/2018 | मंजूर |
| 38 | **श्रीम. भारती मंगळ्या कोळी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 105 दिवाळे येथे न.मुं.म.पा.मार्फत विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचे काम करण्यात आले ते निकृष्ट दर्जाचे केले गेले होते. सदर काम निकृष्ट असल्याने विद्युत वाहिन्या अनेक ठिकाणी खंडीत होत आहेत. तरी सदरचे काम ज्या ठिकाणी समस्या आहेत त्या ठिकाणी काम करणे. | 94<br>ऑगस्ट | 113<br>19/01/2018 | मंजूर |
| 39 | **श्रीम. भारती मंगळ्या कोळी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 105 दिवाळे येथील पूर्ण प्रभागातील 6 ठिकाणी बस थांबे आहेत ते नवीन बसविणे. | 95<br>ऑगस्ट | 114<br>19/01/2018 | मंजूर |
| 40 | **श्रीम. भारती मंगळ्या कोळी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 105 दिवाळे गावातील संपूर्ण गटर, तसेच पदपथची अवस्था अतिशय खराब झालेली आहे. तरी सदर ठिकाणाचे गटर तसेच पदपथ बांधणे. | 96<br>ऑगस्ट | 115<br>19/01/2018 | मंजूर |
| 41 | **श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील प्रभाग क्र. 67 मध्ये सेक्टर-19अे, तुर्भे, प्लॉट नं.19 व 20 कृष्णा ॲन्ड हरिओम इन्टरप्रायजेस समोरील व परिसरातील गटारे नादुरूस्त आहेत तरी ती नवीन बनवून स्लॅम कॉंक्रीटीकरण करणे. | 97<br>ऑगस्ट | 116<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 42 | **श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील प्रभाग क्र 67, मधील सेक्टर-20, तुर्भे जवळील गॅस एजन्सीच्या (न.मुं.म.पा. डेपोच्या पाठीमागील) दोन्ही बाजूचे पदपथ खुपच खराब झाल्यामुळे ते नव्याने बनविणे. | 98<br>ऑगस्ट | 117<br>19/01/2018 | मंजूर |
| 43 | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 79, सानपाडा सेक्टर 10, Shopping Center समोरील जागा जी स्टॉलसाठी राखीव आहे. सदरची जागा सिडकोकडून हस्तांतरीत करून सुशोभिकरण करणे. | 99<br>ऑगस्ट | 118<br>19/01/2018 | मंजूर |
| 44 | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 79, सानपाडा येथील बाबू गेनू मैदान सेक्टर 8 सानपाडा येथे व्यासपीठ (योगासने करण्यासाठी) बनविणे. | 100<br>ऑगस्ट | 119<br>19/01/2018 | मंजूर |
| 45 | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>पुणे महानगरपालिका ठाणे महानगरपालिका धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांना प्रॉपटी टॅक्सवरील व्याज माफ करून टॅक्स भरण्यासाठी अभय योजना (Amensty Scheme) लागू करणे. | 101<br>ऑगस्ट | 120<br>19/01/2018 | मंजूर |
| 46 | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>महिला बाल कल्याण विभागातील स्वयंरोजगारासाठी 10 वी पास अट शिथील करणेबाबत व महिला स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी उत्पन्न दाखला अट रद्द करणे. | 102<br>ऑगस्ट | 121<br>19/01/2018 | मंजूर |
| 47 | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तलावांची संख्या भरपूर असून, दरवर्षी माणसे, मुले बुडून दुर्घटना होत असतात. सदर परिसरात 24 तास कायमस्वरूपी सुरक्षा नेमणे. | 103<br>ऑगस्ट | 122<br>19/01/2018 | मंजूर |
| 48 | **श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, कुकशेत गाव येथील गावदेवी मैदानाची सुरक्षाभिंत दुरावस्थेत असल्याने त्वरीत सुधारणा करणे. | 104<br>ऑगस्ट | 123<br>19/01/2018 | मंजूर |
| 49 | **श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, कुकशेत गावातील पार्किंग समस्या दूर करण्यासाठी भूखंड क्रमांक पी 16 व भूखंड क्रमांक पी 06 येथे तात्पुरत्या स्वरूपाची पार्किंग व्यवस्था करणेकरीता डेब्रिज हटवून कॉंक्रीटीकरण करणे. | 105<br>ऑगस्ट | 124<br>19/01/2018 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**